E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 5.711

# AKSHARA

## MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Peer-Reviewed & Refereed International Research Journal
February 2025 Special Issue 16 Volume VI (B)

## Viksit Bharat 2047: Sustinable Development Through World Peace



Executive Editor
Dr. Rajaram M. Kamble

Guest Editor
Prin. Captain Dr. Mahesh Gaikwad

Arts, Commerce and Science College, Nagthane Tal and Dist Satara (Maharashtra)

Chief Editor : Dr. Girish S. Koli

Akshara Publication

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | जागतिक शांतता ,सुरक्षा, आणि सुशासन 'विकसित भारत 2047' च्या दृष्टीक्षेपात | प्रा. एस . एस . कोकरे | 115 |
| 36 | जागतिक सुरक्षा, शांतता आणि राजकारण | प्रा. प्रगती बाळासाहेब पुंडे. | *118* |
| 37 | जागतिक राजकारणात भारताची भूमिका | श्री. संजय नाना बागल | *121* |
| 38 | भारत: दुनिया में उभरती हुई महाशक्ति | भालचंद्र नागनाथ बिचितकर<br>प्रा. डॉ. अतुल कदम | *126* |
| 39 | आदिवासींच्या विकासातील पेसा कायद्याची भूमिका | श्रीमती सीमा जालिंदर भोसले | 129 |
| 40 | सुशासनाची अंमलबजावणी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पारदर्शकता | डॉ. महेश एम. लोहार | 133 |
| 41 | महात्मा गांधींना अभिप्रेत पर्यायी विकासनीती | डॉ. निळकंठ कामण्णा लोखंडे | 136 |
| 42 | विकसित भारताच्या दृष्टिकोनातून गांधी विचारांचे महत्त्व | डॉ. नागनाथ महादेव चोबे<br>डॉ. शिवाजी रावसाहेब नेटके | 140 |
| 43 | A Study of Challenges and Strategies in Digital Sociology Learning in India | Dr. Sanjay Shamrao Kamble | 144 |
| 44 | Nation Building in India: Challenges of Identity, Unity, and Diversity | Mr.Santosh Bapurao Nilakhe | 148 |
| 45 | भारतीय समाजातील विविधतेचे स्वरूप आणि महत्व | डॉ. राजेंद्र बगाटे | 150 |
| 46 | दिव्यांग महिलांच्या समस्या | प्रविण उत्तम रणबागले | 154 |
| 47 | भारतीय समाजव्यवस्थेत विविधतेचे महत्व | सौ उन्नती अमृतराव पाटील | 156 |
| 48 | भारतीय समाज के परिवर्तन में डिजिटलीकरण और प्रौद्योगिकी की भूमिका भारत 2.0: 2047 के लिए एक दृष्टिकोण | दिव्या शर्मा | 159 |
| 49 | लिंगभाव असमानता :शिक्षण व आरोग्य | डॉ.उतम बी. वाघमारे | 160 |
| 50 | औदयोगिक विकास प्रकल्प आणि सदय:स्थिती एक संशोधनात्मक अभ्यास | प्रा. अशोक शंकर शिंदे | 162 |
| 51 | भारतातील विविधतेचा अभ्यास | प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव. | 165 |
| 52 | महिला सक्षमीकरणाची वर्तमान स्थिति आणि भविष्यातील आव्हाने - एक अभ्यास | प्रा.अभय जायभाये | 169 |

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.711 / February 2025 / Special Issue 16 Volume VI (B)

51

# भारतातील विविधतेचा अभ्यास

**प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
विवेकानंद महाविद्यालय {अधिकार प्रदत्त स्वायत्त संस्था} कोल्हापूर

**प्रस्तावना :-** भारत हा विविधतेने नटलेला देश आहे.भारतात जे विविधता आहे.तशी विविधता जगात कोणत्याही देशात पाहण्यास मिळणार नाही.भारतीय समाजातील विविधता ही विकसित भारत बनविण्यासाठी महत्वाची आहे. भारतातील नैसर्गिक विविधता ही भारताला मिळालेली अमूल्य अशी देण आहे. निसर्गाच्या कुशीत अमूल्य अशी खनिज साधन संपत्ती आहे. भारतात अनेक धर्म आहेत हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध, शिख, जैन, पारसी अशा वेगवेगळ्या धर्माचे लोक भारतात वास्तव्य करतात.ज्या प्रमाणे भारतीत धार्मिक विविधता आढळते त्याच प्रमाणे भारतात सांस्कृतिक विविधता आढळते. प्रत्येक राज्याची संस्कृती वेगळी आहे, प्रत्येक धर्माची संस्कृती वेगळी आहे. त्याच प्रमाणे ग्रामीण भागातील व शहरी भागातील तसेच आदिवासी भागातील संस्कृतीत वेगळे पण आहे. भौगोलिक विविधता भारतात मोठ्या प्रमाणात भौगोलिक विविधता आहे काही भागांमध्ये सातत्याने दुष्काळ जाणवतो तर काही भागांमध्ये अतिवृष्टी होते तर काही भागांमध्ये बर्फ पडत असतो तर भारतामधील काही भाग वाळवंट आहे. अशा प्रकारची भौगोलिक विविधता भारतामध्ये पहावयास मिळते.

भारतात भौगोलिक विविधता ज्याप्रमाणे आहे त्याचप्रमाणे भाषिक विविधता पण भारतामध्ये दिसून येते भारतात राज्याची किंवा प्रांताची जी रचना झालेली आहे ती भाषिक आधारावर झालेली आहे म्हणून भारतामध्ये प्रत्येक राज्याची भाषा वेगळी आहे, प्रत्येक राज्याचीच वेगळी तर आहेच तसेच प्रत्येक 100 किलोमीटर ला भाषेमध्ये बदल होत असलेले आपल्याला दिसते. भारतात अशा अनेक भाषा आहेत. ज्याबोलल्या तर जातात पण त्यांना लिपी नाही.

भारतीय संस्कृती ही जगात वेगळी संस्कृती मानली जाते भारताला खूप मोठा प्राचीन इतिहास आहे त्यामुळे भारतातील धर्म भारतातील भौगोलिक विविधता भारतातील सांस्कृतिक विविधता हे भारतीय समाजाचे वेगळेपण दाखवून देण्याचे काम करतात. भारतामध्ये वांशिक भिन्नता ही दिसून येते. भारतात अनेक वंशाचे लोक असलेले दिसून येतात. त्यांची शारीरिक रचना कपाळ ,होठ, रंग, यासारखी वांशिक विविधता भारतामध्ये आहे . आर्य अनार्य असे अनेक वंशाचे लोक भारतीय समाजामध्ये आहेत.

कोणत्याही देशाचा इतिहास भाग त्याची भौगोलिक परिस्थिती आणि त्यात राहणाऱ्या व्यक्ती यांच्या कर्तृत्वातून तयार होत असतो त्या दृष्टीने भारताची भौगोलिक परिस्थिती एक प्रभावशाली राष्ट्र म्हणून समोर आली आहे उत्तरेला हिमालय आणि त्याच्या आजूबाजूला पसरलेला पर्वतरांगामुळे सर्व भारत आपोआपच संरक्षित झालेला आहे पूर्व पश्चिम आणि दक्षिणेला अनुक्रमे बंगालचा उपसागर अरबी समुद्राने हिंदी महासागर पसरलेला असल्याने समुद्र तटाकडूनही भारत संरक्षित झाला आहे त्याचे त्याच्या जीवन पद्धतीवर आणि इतिहासावर आपोआपच परिणाम घडून आलेले आहेत इतिहासाच्या अगदी प्रारंभ काळापासून भारत भौगोलिक दृष्ट्या वेगळा बनल्याने इथली संस्कृती जगातील इतर सर्व संस्कृती पेक्षा अगदी वेगळ्या प्रकारे विकसित झालेली आपल्याला दिसून येते. भारत हा विविध निर्णय घेतलेला देश असला तरी या विविध मध्ये एक प्रकारची एकता असलेले आपल्याला दिसून येते जगातील सर्वात उंच पर्वत वाळवंटे महानद्या यांनी हा देश समृद्ध झाला आहे भारतात सर्व प्रकारची खणसंबंधी संपत्ती वनस्पती सर्व प्रकारचे पिके आढळून येतात जगातील सर्वात जास्त पाऊस भारतात श्रीरामपूर जिल्हा पडतो तर थरच्या वाळवंटात पाण्याचा एकही थेंब पडत नाही अति उष्ण आणि अति थंड असे परस्परविरोधी हवामानाचे पट्टे भारतामध्येच पाहायच मिळतात सम विषम दमट उष्ण अति उष्ण सर्दंड अति थंड असे हवामानाचे प्रकार भारतात दिसून येतात

**संशोधन पद्धती :-** प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय संकलनाचा वापर करण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे .

**संशोधनाचा उद्देश:-**

1) भारतातील सांस्कृतिक वेगळेपण अभ्यासने.

2)भारतातील धार्मिक विविधता अभ्यासने.

3)भारतातील वांशिक विविधता अभ्यासने.

4)भारताचे भौगोलिक वेगळेपण अभ्यासणे.

**संशोधनाचे गृहीतके :-**

1) भारतात विविध धर्माचे लोक वास्तव्य करतात.

2) भारतात सांस्कृतिक विविधतेत एकता आहे.

3)भारतात भौगोलिक वेगळेपण आहे.

4) भारतात अनेक वंशाचे लोक आपले वेगळेपनात एकात्मता टिकून ठेवतात.

**भारतातील विविधतेचा अभ्यास भारतातील**

**भारतातील धार्मिक विविधता :-**

भारतीय समाजा बहुधर्मी असून जगातील प्रमुख धर्म भारतात पास मिळतात अर्थात भारतात हिंदू धर्मे लोक बहुसंख्य असले तरी इस्लाम ख्रिश्चन सिंग जयंत पारशी इत्यादी धर्माची लोके भारतात आहेत भारतात प्रचलित धर्मापैकी इस्लाम क्रिष्णांनी पार्शिया धर्माचा उगम भारताबाहेर झाला तर बहुत जैन, शीख, हे धर्म भारतातच उदयात आलेले आहेत, हिंदू धर्म कोण्या एका व्यक्तीने स्थापन केलेला नसून काळाच्या ओघांमध्ये त्याची निर्मिती झालेली आहे इस्लाम ख्रिश्चन बौद्धिक व पारशी या धर्माचा प्रत्येकी एकच संस्थापक आहे प्रत्येक धर्माचे वेगवेगळे धर्मग्रंथ आहेत त्या धर्मग्रंथानुसार त्या धर्मातील लोक आचरण करत असतात काही धर्मामध्ये मूर्तिपूजा मान्य करण्यात आली आहे तर काही धर्मामध्ये मूर्तिपूजा अमान्य करण्यात आलेले आहे काही धर्मामध्ये अनेक देवदेवता आहेत अनेकईश्वर वाद आहे तर काही धर्मामध्ये एकेईश्वर वाद पाहण्यास मिळतो . लोकसंख्येचा विचार करता भारतात हिंदू ८२.६% बौद्ध 0.71% जैन 0.48% सीख 1.96% मुस्लिम 11.35% ख्रिश्चन 2.43% आणि इतर 0.03% अशा विविध धर्माचे लोक भारतामध्ये वास्तव्य करतात प्रत्येकाचे पंत वेगवेगळे आहे त्यांच्या चालेरीती परंपरा याबाबतही फरक आहे त्यामुळे अशी धार्मिक वित्त जगात इतर कुठेही पाहता येणार नाही प्रत्येक धर्माच्या नैतिकतेच्या विशिष्ट अशा संकल्पना असतात आचरणाचे काही नियम असतात तसेच प्रत्येक धर्माचा आधार कोणत्या ना कोणत्यातरी दिव्यशक्तीवरील विश्वासात पाहावयास मिळतो अशा दिव्यशक्तीची पूजा प्रार्थना आराधना प्रत्येक धर्मांत होत असते शिवाय प्रत्येक धर्माची प्रतीके वेगवेगळी असतात. धार्मिक ग्रंथी वेगवेगळे आहेत. यातील काही धर्म हे परदेशी मूळ असलेले तर काही भारतातील हिंदू धर्मापासून विभक्त होऊन नंतरच्या काळात स्वतंत्रपणे निर्माण झालेले असल्याचे दिसतात अर्थात एक गोष्ट इतकीच सत्य आहे की हे सर्व धरण भारतात जरी वर्षानुवर्षी एकत्र नांदत असले तरी भारतात ही धार्मिक विविधता बहु धर्मीयता ही भारताच्या एकात्मतेला आव्हान देणारे आणि भारतात विसर्वाद निर्माण करणारी ही ठरत आहे हा एक विरोधाभास आहे तसेच ते एक विदारक सत्य आहे स्वतःच्या धर्माला राष्ट्रापेक्षा मोठा मान्य राष्ट्रापेक्षा स्वतःच्या धर्मावर अधिक निष्ठा दाखविणे म्हणजे धर्मश्रेष्ठ यामुळे संघर्षाला खतपाणी घातले जाते तसेच संघर्ष जोपासलाही जातो अशा अनेक धार्मिक सांप्रदायिक संघर्षाचा सामना आजवर भारताने केला आहे भारतात शेकडो वर्षापासून परस्पर सानिध्यात राहिल्यामुळे वेगवेगळ्या धर्माचा प्रभाव वेगवेगळ्या धर्माच्या कल्चरचा प्रभाव इतर धर्मावर पडलेला आहे तर त्यामुळे कोणताही धर्म स्वतंत्र वाटत असला तरी परस्परांच्या सानिध्यामुळे बहु धार्मिक स्वरूप आपल्याला धर्माचे पाहावयास मिळते.

भाषिक विविधता :- भाषा एक माध्यम आहे परस्परांमध्ये संवाद साधण्याचे एक साधन आहे संदेशवहनाचे ते प्रभावी असे माध्यम आहे भाषा हे भारतातील विविधतेचे आणखी एक महत्त्वाचे प्रतीक आहे कारण सामूहिक एकता जपण्याचा आणि त्याचबरोबर सामाजिक एकतेला सुरू लावण्याचे कार्य ही भाषाच करते म्हणून एअर देसाईने म्हटले आहे की भारत म्हणजे भाषाचा एक प्रेक्षणीय संग्रहालय आहे भारतातील विविध प्रकारच्या भाषा पाच मुख्याशा भाषिक समूहात विभागाला गेल्या आहेत त्यामध्ये ऑस्ट्रिक, इंडो आर्यन द्रविडीयन युरोपियन आणि सीनो तिबेटियन या प्रमुख भाषिक समूहाचा समावेश होतो भारताच्या राज्यघटनेने प्रमुख अशा 18 भाषांना मान्यता दिली आहे पण त्याचबरोबर 1652 भाषा आणि बोलीभाषा ही प्रचारात आहेत हे लक्षात घेतले पाहिजे यातील बहुतेक भाषा या मातृभाषा आहेत भारतात सुमारे 100 भाषांमध्ये वर्तमानपत्र प्रकाशित होतात वर्तमानपत्रे आणि नियतकालिके यांची वार्षिक संख्या सुमारे 50,000 आहे अगदी काही आदिम बोलीभाषा ही पुसल्या गेलेल्या नाहीत तर त्यातील वाङ्मय दिवसेंदिवस वाढत आहे भारतातील बहुसंख्य लोक हिंदी भाषा बोलतात आणि घटनेने हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता दिली आहे तरी हिंदी ही इंग्रजीला समर्थ पर्याय ठरलेला नाही इतर प्रमुख भाषांच्या अस्तित्व ही एक प्रकारे भाषिक समूहात ते निर्माण करणारे ठरत आहे साहजिकच भाषेचा प्रश्न राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील एक प्रमुख आडसला बनत आहे भारतीय राज्यघटनेने 18 भाषांना मान्यता दिली आहे त्या मातृभाषा म्हणजे बोलल्या जातात या भाषा म्हणजे उर्दू, हिंदी, मराठी, तेलगू, तामिळ, गुजराती, कन्नड, मल्याळम, बंगाली, ओडिया, पंजाबी ,आसामी, सिंधी ,नेपाली ,कोकणी, मणिपुरी ,काश्मिरी, आणि संस्कृत अशा 18 भाषा आहेत.

भारतातील भाषिक वर्गीकरण:-

ऑस्ट्रिक भाषा, या भाषेचे मुंडा मुखमेर असे दोन भाग पडतात मुंडा भाषेमध्ये सुमारे 14 आदिवासी भाषे येतात तर मूकमेमध्ये खासी आणि निकोबार ई या दोन बोलीभाषा मोडतात अस्तित भाषा ही प्रामुख्याने मध्यव पूर्व भारतातील आदिवासी लोकांचे बोलीभाषा आहे. भौगोलिक दृष्ट्या या भाषेचे जास्त प्रमाणात निकोबार बेटे, मेघालय, राची, परगना, या जिल्ह्यात आढळते.

सिनोतिबेटीयन :- या भाषेचे तिबेट हिमालयन भाषा उत्तरआसामी भाषा आणि बर्मीज भाषा असे तीन प्रकार पडतात हे भाषिक सिक्कीम हिमाचल प्रदेश लडाख नागालँड मिझोरम या भौगोलिक भागात बोलल्या जातात.

द्रविडियन :- या भाषेचे दक्षिण मध्य आणि उत्तर असे तीन भाग पडतात दक्षिण भागात तमिळ मल्याळम आणि कन्नड तर मध्य भागातील गोंदी तर उत्तर भागात पोरं आणि मानतो या दोन भाषा येतात भौगोलिक दृष्टिकोनातून जर विचार केला तर ही भाषा बोलणारे दखखनचे पठार दक्षिण भारतातील आंध्र तामिळनाडू कर्नाटक केरळ या राज्यांमध्ये आढळतात.

आर्यन भाषा :- आर्यन भाषिक समूहात दार्डीक आणि इंडो आर्यन असे दोन उपविभाग पडतात दार्डीक भागात चार बोलीभाषा आहेत त्या म्हणजे दार्डी कोहिस्तानी , शिवा आणि काश्मिरी इंडो-आर्यन भाषेक, विभागात वायव्य सिधी कच्छी, लांडा, भाषा पूर्व मध्ये अवधी बघेली छत्तीसगढी

भाषा मध्ये विभाग गुजराती, मारवाडी, मेवाडी, माळवी, पंजाबी, भाषा तर दक्षिण गट मध्ये मराठी, कोकणी, भाषा तर पूर्व गट मध्ये असामी बंगाली बिहारी मगधी, मैथिली, भोजपुरी व उडिया हे भाषिक गट आढळतात. अशा प्रकारची भाषिक विविधता आढळते.

**वांशिक विविधता :-**

भारताची भौगोलिक जडणघडण अशी आहे की तिच्यामुळे भारतात राहणाऱ्या आदीकालीक रहिवाशांना आपोआप परचक्रापासून नैसर्गिक संरक्षण मिळत गेले त्यामुळे भारतात आलेले वंशाच्या अस्तित्वा अबाधित राहिले आहे साहजिकच भारतातील लोकसंख्येत अनेक प्राचीन वर्षाचे मिश्रण झालेले आढळते भौगोलिकतेचा आधार मिळाल्यामुळे ज्या अध्यय रहिवासी वार्तात होते त्यांना नंतर आलेल्या भिन्नवंशी लोकांकडून विस्थापित व्हावे लागले नाही तसेच जे जे वंश भारतामध्ये काळानुसार येत राहिले ते सर्व आपल्या अस्तित्व तर टिकू शकलेच शिवाय एक ऐतिहासिक परंपरा ही निर्माण करू शकले त्यामुळे भारतात जगात इतर कुठेही आढळणार नाही अशा अनेक विविध वंशाचे अस्तित्व पहावयास मिळते.

**वंश किंवा वांशिकता म्हणजे काय** - वंश ही एक जीवशास्त्रीय कल्पना आहे त्यामुळे वर्ष म्हणजे समान शारीरिक लक्षणे असलेला एक समूह मानसशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर वंश हे मानव जातीचे प्रमुख विभाजन असून जन्मजात शारीरिक वैशिष्ट्येच्या आधारे ती ओळखले जाते.

डी. एन .मजुमदार च्या मते :-" जर एखादा माणूस आपल्या समान अशा अनेक शारीरिक गुणवैशिष्ट्यामुळे दुसऱ्या गटावरून भिन्न ठरविता आला तर अशा जीवशास्त्रीय गटातील सदस्य दूरवर पसरलेले असले तरी त्यांचा एक वंश तयार होतो"

रिसले आणि 1901 च्या जनगणनेच्या आधारे वंशाचे वर्गीकरण केले आहे.

तुर्की इरानियन त्या प्रकारात बलुची अफगाणी व वायवेकडील प्रांतात राहणारे लोक यांचा समावेश होतो तुर्की पार्शियन लोकांच्या वैशिष्ट्याची संमिशन या लोकांमध्ये आढळते सरासरी उंची पेक्षा त्या अधिक उंच असतात गोर वर्ण काळे डोळे घारे डोळे दाट केस रुंद डोके मध्यम प्रमाणात नाक रुंद पण तरतरीत असते.

,इंडो आर्यन, शिथो द्रविडियन, आर्यो द्रविडियन, मंगोलो द्रविडियन ,मंगोलाईड, द्रविडियन,

**डॉ. गुहा यांनी केलेले वर्गीकरण**

1931 च्या जनगणनेच्या आधारे भारतातील वंशाचे सुधारित वांशिक वर्गीकरण पुढील सहा प्रकारात केली आहे.

**निग्रिटो:-** अंदमान बेट व बंगालचा उपसागर येथील रहिवासी हे निग्रोवंशी असावेत तर काहींच्या मते दक्षिण हिंदुस्थानातील जंगलात राहणारे काही आदिवासी निग्रो वंशी असावेत.

**प्रोटो ऑस्ट्रेलॉइड:-**

निग्रो वर्षानंतर भारतात प्रोटो ऑस्ट्रेलॉइड या वंशातील लोकांचे आगमन झाले यांनाच द्रविड पूर्व असे म्हणतात, यांचे पूर्वज प्ले स्टाइल मधील असावेत असा अंदाज आहे या वर्षातील लोकांचे गुणधर्म भारतातील बहुतेक सर्वच आदिवासी जमातीत आढळतात काळा काळा तपकिरी रंग लांब डोके रुंद बसके नाक, कुरळे केस लहानसा बांधा अशी शारीरिक वैशिष्ट्ये आहेत.

**मोंगोलॉइड :-** आसाम नेपाळ व पूर्व काश्मीर येते या जमाती आढळतात.

मेडिटरेनियम काश्मीर राजस्थान उत्तर प्रदेश येथे लोक आढळतात.

**वेस्टर्न ब्राचिसेफाल्स:** या वंशातील लोक मूळचे पश्चिमेकडील तिकडून ते भारतात शिरले असावेत युरोपियन वंशातील लोकांशी यांचे साहचर्य आढळते त्यामुळे त्यांना अल्पाईन असेही म्हणतात.

नार्डीक:- ख्रिस्त पूर्व 2000 वर्षाच्या सुमारास हे लोक हिंदुस्तानच्या उत्तरेकडून भारतात आले असावेत गोरा रंगाचे मध्यम ते लांब आकाराचे डोके अरुंद नाक व उंच लोक उत्तर हिंदुस्थानात आढळतात. हिंदुस्तानच्या पश्चिम भागात व पूर्व बांगलादेशमध्ये आढळतात.

**सांस्कृतिक विविधता :-**

भारतात सांस्कृतिक विविधता खूप मोठ्या प्रमाणामध्ये आहे जगात अशी कुठे संस्कृती सापडणार नाही जे विविधतेने नटलेली आहे प्रत्येक राज्याचे पोशाख वेगळे आहेत पोशाख परिधान करण्याची पद्धती वेगळी आहे देशामध्ये अनेक राष्ट्रीय सण आहेत तर देशामध्ये आणि एक प्रादेशिक सण आहेत राष्ट्रीय सण जरी असले तरी प्रत्येक राज्यामध्ये सण साजरे करण्याची पद्धत मात्र वेगळी आहे महाराष्ट्रातला पोळा कर्नाटक मधला बेंदूर अशा वेगवेगळ्या सण उत्सवामध्ये विविधता असलेले आपल्याला दिसून येते. भारताचे भाषिक विविधता ही खूप मोठ्या प्रमाणामध्ये आहे भारतामध्ये प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात भारतात प्रत्येक राज्याचे खानपान विषयक नियम वेगळे आहेत प्रत्येक राज्याचे ठराविक खाण्याचे पदार्थ वेगळे आहेत जसं महाराष्ट्रामध्ये ज्वारीची भाकर वडापाव या गोष्टीला महत्त्व आहे तसेच आंध्रामध्ये तांदळापासून बनणारे पदार्थ खूप मोठ्या प्रमाणात दिसून येतात पंजाब मध्ये घराचे खूप मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. तर प्रत्येक राज्याची खाद्य संस्कृती ही वेगळी असलेली दिसून येते प्रत्येक राज्यामध्ये नृत्यकला वेगवेगळ्या आहेत. प्रत्येक राज्यामध्ये प्रत्येक समाजाच्या प्रथा परंपरा रितीरिवाज वेगवेगळ्या आहेत धर्म कर्मकांड पुजा अर्चा या विविधतेने नटलेल्या सांस्कृतिक परंपरेचा वारसा भारताला लाभलेला आहे. भारतातील विविध जाती त्यांचे खानपान रीतीरी वाच अस्पर्श अस्पृश्यता जातीनुसार व्यवसाय प्रत्येकाचे कुलदैवत वेगळे अशी वैविध्यपूर्ण संस्कृती भारतीय समाजामध्ये दिसून येते

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.711 / February 2025 / Special Issue 16 Volume VI (B)

**भारतातील भौगोलिक विविधता :-**

भारत भूमी ही विविधतेने नटलेली भूमी आहे. जम्मू-काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत भौगोलिक विविधता दिसून येते. काही ठिकाणी अतिवृष्टी होते काही ठिकाणी भरपूर बर्फ पडतो तर काही ठिकाणी कोरडे वाळवंट आहे. उत्तरेकडील पर्वतमय प्रदेश यात काश्मीर कांगरा टेहरी कुमाऊ नेपाळ सिक्कीम आणि भूतान हे सर्व प्रदेशात येतात. या ठिकाणी पर्वताच्या खूप मोठ्या रांगा आहेत .तर उत्तरेकडील विस्तीर्ण गंगा यमुनेचे खोरे पहावयास मिळते. सिंधू आणि तिच्या पंचांग नद्याच्या खोऱ्याचा प्रदेश शिंद आणि राजपुताण्यातील वाळवंटे, तसेच गंगा यमुना आणि ब्रह्मपुत्रा नद्यांच्या, खोऱ्याचा प्रदेश इत्यादीचा अंतर्भाव या भागामध्ये होतो ,भारतीय संस्कृतीची जडणघडण या नद्याच्या खोऱ्यामधूनच झालेली आहे, तसेच दख्खनचे पठार संपूर्ण प्रदेश गंगेच्या खोऱ्याच्या दक्षिणेला असून विद्य आणि सातपुडा आणि आरवली यांच्या रंगाने हा संपूर्ण प्रदेश विभक्त केलेला आहे या प्रदेशात पूर्व पश्चिम घाटामुळे उत्पन्न झालेला धोरण आकृती प्रदेश आणि उत्तरेकडील सातपुडा या रांगाच्या काठाच्या प्रदेशाचा समावेश होतो, हे भूगर्भशास्त्रीय दृष्टीने हिमालयापेक्षाही जास्त प्राचीन आहे, पुराने पश्चिम घाटाचा जर विचार केला तर दक्षिणेतील या प्रदेशात पूर्व आणि पश्चिम किनारपट्टी कोकण मलबारांनी त्याचप्रमाणे गोदावरी कृष्णा कावीळ या नद्याच्या खोऱ्यातील प्रदेशाचा अंतर्भाव होतो. दख्खन पठाराला पश्चिमेकडे अरबी समुद्राला समांतर अशी पश्चिम घाटाची पर्वत श्रेणी 700 मैल लांबावर पसरलेली आहे. तर पूर्वेला पूर्व घाट पसरलेला आहे पश्चिम किनारा आणि पश्चिम घाट यांच्या चिंचोली पट्टी आहे तिची रुंदी पुष्कळ ठिकाणी 20 मैल पेक्षा जास्त नाही. त्यालाच आपण कोकण आणि मलबार म्हणतो भौगोलिक परिस्थितीचा भारतीय इतिहासावर दुर्गामी परिणाम घडून आला आहे. भौगोलिक विविधतेमुळे आणि हवामानामुळे भारताचे आपोआपच  विविध प्रदेशात आणि गटात विभाजन झाले. त्यामुळे त्या त्या ठिकाणी प्रादेशिक भावना वाढीस लागली दुर्गम प्रदेशामुळे निसर्गच निसर्गच आदिम जमातील ना आश्रम मिळत गेला आणि भारतीय संस्कृतीचे जतन झाले लढाऊ जमाती तयार झाल्या लढवण्याची परंपरा निर्माण झाली तसेच प्रादेशिक भावना व तुटक प्रवृत्तीची जोपासना झाली. स्थानिक विभागांना प्रोत्साहन मिळाले भिन्न भाषा आणि वंश यामुळे त्याच्या वेगळेपणात अधिकच भर पडत गेली .

निष्कर्ष :-

भारता व्यतने नटलेला देश आहे भारतात अनेक धर्म पंथ जात भौगोलिक विविधता पर्वतरांगा पठार नद्या दर्या खोरे जंगल जंगलात राहणारे आदिवासी त्यांचं एक वेगळे कल्चर यामुळे भारतीय समाजाच्या व्यक्तीला जगामध्ये एक वेगळी ओळख आहे भारतात एकमेकांशी संवाद साधण्यासाठी अनेक भाषा बोलले जातात राष्ट्रभाषा जरी हिंदी असली तरी प्रांतिक भाषांची संख्या खूप मोठ्या प्रमाणामध्ये आहे अनेक भाषा फक्त बोलल्या जातात त्यांच्यामध्ये लिपीचा अभाव आहे पण विचाराची देवाण-घेवाण करण्यामध्ये या विविध भाषेचे योगदान खूप महत्त्वपूर्ण आहे. आणि एक प्रथा परंपरा आपल्या संस्कृतीचे जतन करत आहेत एवढेच नाही तर आपल्या प्रथा परंपरा जिवंत राहाव्यात यासाठी शासकीय पातळीवर पण खूप मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत गड किल्ल्याचे संरक्षण करणे भारतीय संस्कृतीला प्रोत्साहन देणे भारतीय जी पारंपारिक ज्ञान प्रणाली आहे तिला प्रोत्साहन देऊन आपली संस्कृती टिकून ठेवण्याचा प्रयत्न शासनाच्या स्तरावर करण्यात येत आहे आपल्या देशाला सांस्कृतिक असा वैभवशाली परंपरा लाभलेले आहे विविधतेने नटलेल्या देशात क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा असणारा देश लोकसंख्येच्या दृष्टीने मोठा असणारा देश या देशांमध्ये असणारे वेगवेगळे भौगोलिक विभाग या देशांमध्ये प्राचीन काळापासून असलेला हिंदूधर्म तसेच इतर परकीय देशातून आलेले धर्मही गुण्यागोविंदाने येथे नांदत असताना दिसतात .भारताला वैभवशाली इतिहास लाभला आहे. विविधता ही भारतीय संस्कृतीची एक भाग बनली आहे. या विविधतेने नटलेल्या भारत देशाला एक संघ बांधून ठेवण्यात भारतीय शासनाला यश मिळाले आहे. तरी पण काही ठिकाणी धार्मिक, भाषिक, वाद होतात तरी पण देशातील विविधतेत एकता अबाधीत आहे.भारतात जरी विविधता दिसत असली तरी या विवितेत एकात्मता जोपासण्याचे काम भारतीय संस्कृतीने केले आहे. लोक एकमेकांच्या संस्कृतीचा आदर करतात. अनेक धार्मिक सण उत्सव  वेगवेगळ्या धर्मातील लोक एकत्र साजरे करतात.

संदर्भ :-

1) भारतीय भाषेचे लोक लोक सर्वेक्षण लेखक गणेश देवी -पद्मागंधा प्रकाशन
2) विविधता मे एकता -लेखक शिरसाट भार्गव राधिका, अनुष्का गुप्ता ,ज्योती डुगल ,प्रकाशन -नेशन प्रेस
3) भारत मे जीव विविधता - डॉ. नर्मदेश्वर प्रसाद lris पब्लिकेशन
4) भारतीय संस्कृती विविधता मे एकता का समन्वय -लेखक अंशुल सिंह. सिंगल इसू मॅगझिन -मनोहर पब्लिकेशन